महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६३ वा | दिनांक : ०१/१२/२०२४ | वार : रविवार

## राज्यात भाजपचाच मुख्यमंत्री, तर दोन पक्षांचे दोन उपमुख्यमंत्री : अजित पवार



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सात दिवस झाले असले तरी अद्याप राज्यात सरकार स्थापन झालेले नाही. त्यामुळे अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. मात्र अजित पवार यांनी आता याबाबतच्या सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम देत भाजपसोबत झालेल्या चर्चेचा सविस्तर तपशील सांगितला आहे. राज्यात भाजपचा मुख्यमंत्री होणार असल्याचे आमच्या बैठकीत निश्चित झाले असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. तसेच उर्वरित दोन पक्षाचे दोन उपमुख्यमंत्री असतील, हे देखील निश्चित झाले असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

एवढेच नाही तर राज्यात सरकार स्थापन होईल, त्याचवेळी राज्य मंत्री पदांच्या नावाची देखील घोषणा करणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. या माध्यमातून राज्य सरकार स्थापनेची सर्व चर्चा पूर्ण झाली असल्याचे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत. मात्र भाजपचा मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय हा भारतीय जनता पक्ष घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाच्या बैठकीत याबाबत निर्णय होईल. त्यानंतर सरकार स्थापन केले जाईल, असे देखील पवारांनी सांगितले. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यामुळे महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर आम्ही राज्यासाठी ज्या योजना आखण्याचा विचार केला आहे, त्या योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

राज्यात कोणाचे सरकार असेल आणि कोण मुख्यमंत्री असेल याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. भारतीय जनता पक्षाच्या वतीने देवेंद्र फडणवीस यांचे नाव अंतिम झाले असल्याची माहिती देखील समोर आली आहे. यासंबंधी दैनिक दिव्य मराठीने वृत्त दिले आहे. त्यातच आता अजित पवार यांच्याकडून देखील भारतीय जनता पक्षाचाच मुख्यमंत्री असेल, हे स्पष्ट करण्यात आले आहे.

सरकारचा शपथविधी कधी? याविषयी अजित पवार यांनी सविस्तर बोलणे टाळले. मात्र, दिव्य मराठीच्या वृत्तानुसार देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी पाच डिसेंबर रोजी आझाद मैदान येथे दुपारी एक वाजता होणार असल्याची माहिती माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

## एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन ७ दिवस उलटले आहेत. भाजप, शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महायुतीने २८८ पैकी २३० जागा जिंकल्या आहेत. मात्र शपथविधीबाबत अद्याप सस्पेंस कायम आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवली असली तरी ते गृह मंत्रालयावर ठाम आहेत. २९ नोव्हेंबर रोजी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन शिंदे मुंबईत परतले आणि सर्व कार्यक्रम रद्द करून साताऱ्याला त्यांच्या गावी रवाना झाले. आता त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती आहे. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करण्यासाठी साताऱ्याला गेले आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १०५ अंश सेल्सिअसचा ताप आला आहे. यामुळे ते आज दिवसभर घराबाहेर पडले नाहीत. डॉक्टरांनी त्यांना घरातच सलाईन लावली आहे. ऐन राजकीय घडामोडींच्या काळातच शिंदे यांची प्रकृती बिघडल्यामुळे महायुती सरकारचा प्रस्तावित शपथविधी सोहळा आणखी लांबतो की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

माजी मंत्री दीपक केसरकर हे आज एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी साताऱ्याच्या दरे या त्यांच्या गावी आले होते. पण शिंदेंची प्रकृती ठीक नसल्याचे कळताच त्यांना बंगल्याच्या गेटवरूनच आल्या पावली मुंबईच्या दिशेने माघारी फिरावे लागले.

दुसरीकडे, भाजप विधिमंडळ पक्षाची बैठकही २ दिवस लांबणीवर टाकण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ही बैठक आता १ डिसेंबर ऐवजी ३ डिसेंबर रोजी होईल. याच दिवशी दिल्लीहून २ पर्यवेक्षक येतील. आमदारांशी चर्चा केल्यानंतर ते मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याची घोषणा करतील.

त्यातच भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने दिव्य मराठीला सांगितले की, संघाने हिरवा कंदील दाखवल्यामुळे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यांचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी दुपारी १ वा. मुंबईच्या आझाद मैदानावर होईल. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक उपमुख्यमंत्री त्यांच्यासोबत शपथ घेईल.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## शरद पवारांचा बाबा आढाव यांच्या EVM विरोधी आंदोलनाला पाठिंबा



**मुंबई :** सरकारी तिजोरीतून लोकांना पैशांचे वाटप करण्यात आले असल्याचा आरोप ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी केला आहे. बाबा आढाव यांचे तीन दिवसापासून सुरू केले आहे. त्यांच्या उपोषण स्थळी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी भेट दिली. ईव्हीएम मध्ये घोटाळा झाला असल्याचा आरोप देखील बाबा आढाव यांनी केला आहे. सरकारी तिजोरीची लूट सुरू असल्याचे यावेळी आढाव म्हणाले. राज्यभरातून या उपोषणाला पाठिंबा मिळत असल्याचा दावा देखील यावे उपोषणकर्त्यांच्या वतीने करण्यात आला.

सरकारला विरोधक नकोच आहेत. त्यांना तुम्ही नकोच असल्याचे बाप आढाव यांनी शरद पवार यांच्याशी बोलताना सांगितले. तर शरद पवार यांनीही आमचा बाबा आढवा यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. सरकार जनतेची फसवणूक करत असल्याचे देखील बाबा आढाव यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर ईव्हीएममध्ये नागरिकांनी टाकलेलेच मतदान आहे, याचा पुरावा काय? असा प्रश्न बाबा आढाव यांनी या वेळी उपस्थित केला.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी ईव्हीएम विरोधात आंदोलन सुरू केले आहे. राज्यघटना आणि लोकशाहीची सध्या थट्टा सुरू असल्याची त्यांनी टीका केली. बाबा आढाव पुणे येथील फुले वाडा येथे आंदोलनाला बसले आहेत. महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांनी वयाच्या ९५ व्या वर्षी ३ दिवसांचे आत्मक्लेश उपोषण सुरू केले. ईव्हीएमवरील मतदान प्रक्रिया संशयास्पद म्हणत लोकशाहीचे वस्त्रहरण सुरू असल्याचे बाबा आढाव यांनी म्हण्टले आहे. छगन भुजबळ यांनी देखील आंदोलन स्थळी बाबा आढाव यांची भेट घेतली होती.

उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. अदानींच्या विरोधात लोकसभेत बोलू दिले जात नाही. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे याबाबत मी सरकारच्या विरोधात सत्याग्रह करत असल्याचे आढाव यांनी म्हटले आहे. सरकार जर चुकत असेल तर त्यांना वेळीच सांगितले पाहिजे. लोकशाहीतील एक नागरिक म्हणून माझे ते कर्तव्य आहे. निवडणुकीच्या तोंडावर पैसे वाटप करणारी सरकारी योजना जाहीर करणे म्हणजे भ्रष्टाचाराला अधिकृत करणे आहे. त्यावर निवडणूक आयोगाने कोणताही आक्षेप घेतला नाही, हे अनाकलनीय आहे, असे बाबा आढाव म्हणाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२४

## प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांच्या पुस्तकाचे मेहेगाव येथील भगवानगडावर होणार प्रकाशन




**कन्नड (अरुण थोरात):** येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र, संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे प्रमुख तथा प्रसिद्ध कवी, संपादक डॉ. शिवाजी हुसे संपादित संत गाडगेबाबांचे अखेरचे कीर्तन या पुस्तकाचे प्रकाशन मेहेगाव ता. कन्नड येथील भगवानगडावर रविवारी ( ता. १ ) भगवानगडाचे अध्यक्ष सुधीर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या कार्यक्रमास तिफण कविता महोत्सवाच्या सल्लागार समितीचे अँड. कृष्णा जाधव, प्रा. डॉ. अंबादास सगट, डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. प्रतिभा अहिर ,प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. संजय गायकवाड, यांच्यासह भगवानगड परिसरातील सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, युवक, शिक्षक तसेच कन्नड तालुक्यातील साहित्यिक, गडाचे पदाधिकारी , विविध पक्षाचे नेते यांची उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी तिफण कविता महोत्सव भगवान गड मेहेगाव येथे जानेवारीच्या पहिल्या रविवारी संपन्न होणार आहे. त्यासंदर्भात बैठकीचे ही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास व बैठकिस उपस्थित राहावे असे आवाहन तिफण कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, स्वागताध्यक्ष युवा नेते गणेश घुगे, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे कन्नड तालुकाध्यक्ष प्रविण दाभाडे, डॉ. रामचंद्र झाडे ,सचिव अरुण थोरात आणि संयोजन समितीने केले आहे.

## न्यायालयाच्या निर्णयानंतरही लोकांच्या मनात ईव्हीएमविषयी संशय : मेधा पाटकर



**छत्रपती संभाजीनगर :** ईव्हीएमच्या बाबत लोकांच्या मनात शंका आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला असला तरी लोकांचे समाधान झाले नाही. यामुळेच जनता बाबा आढाव यांना पाठिंबा देत आहेत, असे मत जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी शनिवारी व्यक्त केले. त्या छत्रपती संभाजीनगर येथे बोलत होत्या.

मेधा पाटकर यांना एमजीएम विद्यापीठाच्या वतीने मानद डिलीट ही पदवी प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्या म्हणाल्या की, निवडणुकीत ज्या पद्धतीने रेवड्या वाटल्या जात आहेत महिलांची मते विकत घेतली जात आहेत हे चुकीचे आहे. महिलांना दिली जाणारी रक्कम तोकडी आहे. महिलांच्या समस्या मोठ्या आहेत. मात्र त्याकडे लक्ष दिले जात नाहीत. त्या ऐवजी अशा रेवडी वाटपाचा कार्यक्रम सर्वच पक्ष करत आहेत. १५०० रुपये का होईना महिलांना मिळावे वाटत राहणार यातच महिलांची काय स्थिती आहे हे पाहायला मिळते

यावेळी पाटकर म्हणाल्या की, ईव्हीएम बाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असला तरी या निर्णयामुळे लोकांचे समाधान झाले नाही. राज्यात शेतमजूर कष्टकरी यांचे अनेक प्रश्न आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरीही अडचणीत सापडलेत, असे त्या म्हणाल्या.

बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

## भाजप निवडणुकीत जे काही आश्वासन देते, ते नंतर विसरून जाते : मायावती

**लखनौ :** पोटनिवडणुकीतील दारूण पराभवानंतर मायावती आणि त्यांच्या नेत्यांनी लखनौ येथील बसपा कार्यालयात विचारमंथन केले. या बैठकीला यूपी आणि उत्तराखंडमधील ३०० हून अधिक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. आज पहिल्यांदाच मायावती भाजपवर हल्लाबोल करताना दिसल्या. एसपीचे नावही घेतले नाही. दलित आणि आंबेडकरी बहुजनांना एकत्र यावे लागेल, असे त्या म्हणाल्या. सत्तेची मास्टर चावी मिळवण्यासाठी संघर्षाला बळ द्यावे लागेल.

काँग्रेसप्रमाणेच भाजपवरही अनेकांची नाराजी आहे. पण, भाजप भांडवलदारांच्या समर्थनार्थ आणि गरिबीच्या विरोधात काम करत आहे. त्यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे. पण, लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भाजप विविध जातीयवादी आणि सांप्रदायिक डावपेच वापरत आहे. याचा फायदा ती निवडणुकीत घेते.

मायावती म्हणाल्या- भाजप निवडणुकीच्या वेळी जे काही आश्वासन देते ते निवडणुकीनंतर विसरते. उत्तर प्रदेश सरकार आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडण्याऐवजी धर्माचा वापर करून आपले राजकारण करण्यात व्यस्त आहे. यामुळेच आज उत्तर प्रदेशातील जनता सतत गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता आणि मागासलेपणात जीवन जगण्यास भाग पडते.

मायावती म्हणाल्या- निवडणुकीत मनी पॉवर, मसल पॉवर आणि सरकारी यंत्रणेचा गैरवापर होत आहे. कालच्याप्रमाणे आजही निपक्षपाती निवडणुका हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांचा निवडणूक यंत्रणेवरील विश्वास कमी होत आहे. संविधान आणि लोकशाहीसाठी ही धोक्याची घंटा आहे. संभल आणि अदानी प्रकरणामुळे सध्याचे हिवाळी अधिवेशन सुरू नाही. हे चुकीचे आहे. हिवाळी अधिवेशन चालू ठेवावे.

भाजप व्होट बँकेसाठी तुष्टीकरणाचे राजकारण करत आहे. ते उत्तर प्रदेशातील लोकांना आनंदी आणि सुखी जीवन देऊ शकेल का? भीमराव आंबेडकरांच्या मानवतावादी आणि कल्याणकारी राज्यघटनेबद्दल सर्वजण बोलतात, परंतु संकुचित स्वार्थामुळे कोणतेही सरकार त्याची योग्य अंमलबजावणी करत नाही. दलित आणि इतर बहुजनांच्या खऱ्या हितासाठी आणि कल्याणासाठी अजिबात तयारी नाही, उलट ते एक सौंदर्यवर्धक काम आहे.

६ डिसेंबर रोजी संपूर्ण राज्यात बांधकाम दिन साजरा करण्याबाबत मायावती बोलल्या. यात लखनौमध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमणार आहेत.

## केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधियांवर मधमाशांचा हल्ला





**शिवपुरी :** शिवपुरी येथील माधव राष्ट्रीय उद्यानात केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्यावर मधमाशांच्या थव्याने हल्ला केला. तेथे उपस्थित १२ हून अधिक लोकांना मधमाशांनी घेरले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना कसेबसे बाहेर काढले. चांदपाथा तलावातील ड्रेजिंग मशीनचे उद्घाटन करण्यासाठी सिंधिया येथे आले होते. मधमाशांच्या हल्ल्यानंतर त्यांना उद्घाटन न करताच परतावे लागले.

ही घटना शनिवारी दुपारी ३.३० वाजता घडली. सेलेबी केबलवरील चांदपाथा तलावाच्या (रामसर साइट) पाण्यावर बांधलेल्या प्लॅटफॉर्मवर केंद्रीय मंत्री सिंधिया यांच्यासोबत फक्त काही लोकांनाच जाण्याची परवानगी होती. सिंधिया ड्रेजिंग मशिनकडे सरकताच तेथे उपस्थित असलेल्या लोकांना मधमाश्यांनी चावण्यास सुरुवात केली.

कार्यक्रमात केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्यासह काही लोकांना खाली जाण्याची परवानगी देण्यात आली. बाकीचे सेलिंग क्लबच्या वर थांबले होते. या कार्यक्रमाला शिवपुरीचे आमदार देवेंद्र जैन यांच्यासह भाजपचे अनेक नेते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शूटिंगसाठी घटनास्थळी एक ड्रोन उडवण्यात आला होता आणि सुरक्षेच्या कारणास्तव त्याचा आवाज आणि वाऱ्यामुळे मधमाश्यांनी हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, याची अद्याप पुष्टी झालेली नाही.

माधव नॅशनल पार्कचे सीसीएफ उत्तम शर्मा सांगतात की, काही लोकांना मधमाश्यांनी चावा घेतला होता. यामुळे काही काळ कार्यक्रम रद्द करण्यात आला. नंतर सिंधिया जनसंपर्क कार्यालयाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यानंतर ते पुन्हा सेलिंग क्लबमध्ये पोहोचले. येथे त्यांनी ड्रेजिंग मशीनचे उद्घाटन केले. तलावातील जलकुंभ काढतानाही पाहिले.

माधव नॅशनल पार्कमधील चांदपाथा (सांख्यसागर) तलाव जुलै २०२२ मध्ये रामसर साइटमध्ये समाविष्ट करण्यात आला. भोपाळचे भोजताल हे राज्याचे पहिले रामसर स्थळ होते. यानंतर चांदपाथा (सांख्यसागर) सरोवराला राज्यातील दुसऱ्या रामसर स्थळाचा दर्जा मिळाला.

या तलावात हजारो मगरी आहेत. त्यामुळे या तलावातील मगरींना रामसर साइटचे ब्रँड अॅम्बेसेडर म्हणून घोषित करण्यात आले. यानंतर १० डिसेंबर रोजी माधव राष्ट्रीय उद्यानात नर व मादी वाघिणीला सोडण्यात आले. नंतर एका मादी वाघिणीला बाजूला सोडण्यात आले. येथे पीएम मोदींच्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय मंत्री सिंधिया यांनीही दोन पिल्लांच्या जन्माची गोड बातमी दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२४


## निकालापूर्वीच विरोधी उमेदवाराने मतांचा आकडा सांगितला : रोहिणी खडसे



**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनीही ईव्हीएम अर्थात मतदान यंत्रावर संशय व्यक्त केला आहे. माझ्या प्रतिस्पर्धी उमेदवाराने निवडणुकीपूर्वीच आपण अमूक मतांनी निवडून येण्याची गॅरंटी दिली होती. त्यानंतर प्रत्यक्ष निकालात ५-१० मते सोडली तर तेवढीच मते पडली, असे त्या म्हणाल्यात.

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. त्यानंतर राज्यातील अनेक मतदारसंघातील उमेदवारांनी ईव्हीएमवर संशय व्यक्त करत फेरमतमोजणीची मागणी केली आहे. यात आता राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या मुक्ताईनगरच्या उमेदवार रोहिणी खडसे यांचीही भर पडली आहे. रोहिणी खडसे यांनी शनिवारी आयोजित एका पत्रकार परिषदेत आपल्या मतदार संघातील अनेक मतदान केंद्रावर संशयास्पद निकाल लागल्याचा आरोप केला.

त्या म्हणाल्या, विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच मुक्ताईनगरमध्ये सोशल मीडियावर एक यादी व्हायरल झाली होती. या यादीत माझ्या प्रतिस्पर्धी उमदेवाराने आपण अमूक एवढ्या मतांनी विजयी होणार असल्याची गॅरंटी व्यक्त केली होती. कहर म्हणजे त्या यादीतील आकडे व निकाल लागल्यानंतर विशिष्ट मतदान केंद्रांवरील मतदान तंतोतंत जुळले. हे कसे शक्य आहे? ५-१० मते सोडली तर त्या यादीतील अंदाजानुसार अचूक निकाल लागला. २ दिवसांनी लागणाऱ्या निकालाच्या आकडे एवढ्या अचूकपणे सांगणारा एकही ज्योतिषी अद्याप जन्माला आला नाही. त्यामुळे हे सर्वकाही अत्यंत संशयास्पद आहे.

रोहिणी खडसे पुढे म्हणाल्या की, मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात काही गावांत आमच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला मते मिळण्याची कोणतीही शक्यता नव्हती. पण तिथेही त्यांना जास्त मते मिळाली. मागील ३० वर्षांपासून काही गावांत माझे वडील व मला केव्हाही कमी मतदान झाले नाही. त्या गावांतही आम्हाला कमी मतदान झाले. हे शक्यच नाही. कोणतीही लाट आली किंवा एखादी लोकप्रिय योजना आली म्हणून जवळचे मतदार एवढ्या लवकर नाते तोडत नाहीत. त्यामुळे हा लोकांचा नव्हे तर ईव्हीएमने दिलेला कौल आहे.

रोहिणी खडसे यांनी या प्रकरणी मुक्ताईनगरच्या १६ मतदान केंद्रांवरील व्हीव्हीपॅटच्या पावत्यांची मोजणी करण्याची मागणी केली आहे. यासंबंधी त्यांनी प्रशासनाकडे अर्ज दाखल केला असून, अनामत रक्कमही जमा केली आहे.

रोहिणी खडसे म्हणाल्या, अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रानेही निवडणुकीत ईव्हीएमचा वापर टाळला आहे. तिथे मतपत्रिकेवर मतदान होते. मग आपल्याकडेच ईव्हीएम का वापरले जात आहे? सत्ताधाऱ्यांनी काहीही चुकीचे केले नसेल आणि त्यांना जनतेवर विश्वास असेल तर पुन्हा एकदा मतपत्रिकेवर निवडणूक घेतली जावी. म्हणजे लोकांचा कुणावर विश्वास आहे हे स्पष्ट होईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे, रोहिणी खडसे यांनी मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून यंदा दुसऱ्यांदा निवडणूक लढवली. पण त्यांचा पराभव झाला. २०१९ च्या निवडणुकीत एकनाथ खडसे यांनी ही जागा आपल्या कन्या रोहिणी यांच्यासाठी सोडला. पण त्यावेळी अपक्ष उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी त्यांचा पराभव केला. यंदाही त्यांना चंद्राकात पाटील (शिंदे गट) यांच्याकडूनच पराभवाचा धक्का सहन करावा लागला. चंद्रकांत पाटील यांना ११२३१८, तर रोहिणी खडसे यांना ८८४१४ मते पडली.

## लाडक्या बहिणींना दरमहा ३ हजार रुपये द्या : अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** राज्य सरकारने आपल्या लाडक्या बहिणींनी १५०० रुपये नव्हे तर दरमहा ३००० रुपयांचे अर्थसहाय्य केले पाहिजे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शनिवारी केली.

अंबादास दानवे यांनी जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यासाठी शनिवार आणि रविवार असे सलग दोन दिवस बैठकांचे आयोजन केले आहे. तत्पूर्वी, शनिवारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले, राज्य सरकारने लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये महिना दिला होता. त्यानंतर निवडणुकीत २१०० रुपयांचे आश्वासन दिले होते. मात्र राज्य सरकारने आता कुठल्याही अटी शर्ती न ठेवता महिलांना तीन हजार रुपये महिना दिला पाहिजे.

अंबादास दानवे म्हणाले की, जनमत नसताना असे लोक लाख मतांनी निवडून येतात. या निकालामुळे लोकांना ईव्हीएमवर संशय येत आहे. हा संशय दूर करण्यासाठी सरकारने निवडणुका मतपत्रिकेवर घेऊन दाखवावे. सरकार दोन दिवसात स्थापन होणे आवश्यक होते. पण ते अद्याप झाले नाही. भाजप सहज बहुमत सिद्ध करू शकते. मात्र कुणी नेतृत्व करावे यावर एकमत होत नसावे.

आज आम्ही वैजापूर विधानसभा मतदार संघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीचा यावेळी आढावा घेण्यात आला. धनशक्तीच्या जोरावर विरोधी उमेदवाराने या निवडणुकीत विजयी संपादन केल्याचा सूर यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच पराभवाने खचून न जाता संघटनेच्या तत्त्वानुसार जनकल्याणाच्या प्रश्नांसाठी जोमाने कामाला लागा, असे आवाहन यावेळी केले. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख अविनाश गलांडे,अंकुश सूंब, तालुकाप्रमुख सचिन वाणी, सुभाष कानडे,यांची उपस्थिती होती.

## अब्दुल सत्तारांविरोधात फौजदारी याचिका



**छत्रपती संभाजीनगर :** माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्याविरोधात सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल झाली आहे. निवडणूक शपथ पत्रात खोटी माहिती दिल्या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली आक्रमक झालेत. या प्रकरणी आज कोर्टात सुनावणी झाली. या याचिकेमुळे अब्दुल सत्तारांच्या अडचणीत वाढ होताना दिसून येत आहे. यातच माध्यमांमध्ये चर्चा आहे की अब्दुल सत्तार यांच्या मंत्रिमंडळ समावेशावर भाजपने आक्षेप घेतला आहे.

सिल्लोड प्रथमवर्ग न्यायालयात अब्दुल सत्तार यांच्याविरोधात शपथपत्रासंदर्भात दोन याचिका दाखल झाल्यामुळे अब्दुल सत्तार यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झालेली आहे. दोन्ही प्रकरणे त्यांच्यासाठी अत्यंत त्रासदायक ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, दिव्य मराठी डिजिटलने या संदर्भात अब्दुल सत्तार यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचा संपर्क झाला नाही.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सिल्लोड सोयगाव मतदारसंघ १०४ मध्ये उमेदवार अब्दुल सत्तार अब्दुल नबी त्यांचे प्रतिस्पर्धी सुरेश पांडुरंग बनकर यांच्या विरोधात २४२० मतांनी निवडून आलेले आहेत. सिल्लोड विधानसभा निवडणूक संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड चर्चेत राहिली होती व वादग्रस्त ठरली होती. सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ता महेश शंकरपेल्ली व पुणे येथील डॉ. अभिषेक हरिदास यांनी अब्दुल सत्तार यांच्या नामनिर्देशन पत्र सोबत सादर केलेल्या शपथबद्ध शपथपत्रावर मतदान पूर्वीच लेखी आक्षेप सादर केला होता. परंतु सदर आक्षेपावर निवडणूक आयोगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. वास्तविक पाहता शपथपत्रात खोटी, भ्रामक व दिशाभूल माहिती देणे लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ कलम १२५अ नुसार गुन्हा आहे. तक्रारीबाबत आयोगाने कोणतीच कारवाई न केल्यामुळे शेवटी शंकरपेल्ली व डॉ. अभिषेक यांनी सदर प्रकरणात सिल्लोड दिवाणी तथा फौजदारी न्यायालयात फौजदारी याचिका क्र. २७८/२०२४ दाखल केली आहे.

भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २१०, २२३, लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ कलम १२५अ व मानव संरक्षण अधिकार अधिनियम १९९३ कलम ३० अन्वये सदर याचिका दाखल करण्यात आलेली आहे. उमेदवार हे सातत्याने प्रत्येक निवडणुकीत खोटी माहिती देऊन निवडणूक लढवत आहेत, त्यामुळे मतदारांची फसवणूक होऊन मानव अधिकार हक्काचा भंग होत आहे, असा गंभीर आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत अब्दुल सत्तार अब्दुल नबी व निवडणूक निर्णय अधिकारी लतीफ इब्राहिम पठाण यांना प्रतिवादी बनविण्यात आलेले आहे.

अब्दुल सत्तार यांच्या सन २०१९ च्या शपथपत्राबाबत सुद्धा सामाजिक कार्यकर्ता शंकरपेल्ली व डॉ. अभिषेक यांनी सन २०२१ साली सिल्लोड प्रथमवर्ग न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये न्यायालयाने तीन वेळा पोलीस तपासाचे आदेश दिले होते. प्राप्त अहवालानंतर प्रथमदर्शनी तक्रारीत तथ्य असल्यामुळे प्रकरणात न्यायालयाने खटला चालवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अब्दुल सत्तार यांना आचारसंहितापूर्वी १९.१०.२०२४ रोजी प्रकरणात जामीन घ्यावा लागला होता. त्यात ३०.११.२०२४ रोजी न्यायालयाने सुनावणी ठेवली आहे. शंकरपेल्ली यांच्यामार्फत ॲड. एस. आर. काकडे न्यायालयात काम बघत आहेत तर डॉ. अभिषेक हरिदास स्वतः व्यक्तीशः दावा चालवणार आहेत.

काही दिवसांपूर्वी महेश शंकरपेल्ली यांनी अब्दुल सत्तार यांच्या निवडणूक शपथपत्रात १६ चुका असल्याचे सांगताना त्यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. यात त्यांनी सत्तारांनी शपथपत्रात दाखवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि प्रत्यक्ष मालमत्ता यामध्ये प्रचंड तफावत आहे. अनेक मालमत्तांचे क्षेत्रफळ हे चुकीचे दाखवण्यात आले आहे. तसेच मालमत्तेवर करण्यात आलेल्या बांधकामाच्या गुंतवणुकीची माहिती देखील दाखवण्यात आली नसल्याचे या आरोपात म्हटले आहे. काही मालमत्ताची माहिती शपथ पत्रातून गायब करण्यात आली आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये सत्तार त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सबाबतही खोटी माहिती देण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला.

२०१९ विधानसभा निवडणुकीतही सत्तार यांनी शपथपत्रात अनेक गोष्टी लपवून निवडणूक आयोगाची फसवणूक केली होती. यासंदर्भात देखील सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली होती. त्या प्रकरणात देखील न्यायालयाने साताऱ्यांना समन्स बजावले होते. मात्र, हे प्रकरण अद्याप सुनावणीसाठी प्रलंबित आहे. असे असताना सत्तारी यांनी पुन्हा एकदा खोटे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे सत्तार यांची उमेदवारी रद्द करण्यात यावी अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली म्हणाले की, अब्दुल सत्तार यांच्याविरोधात मी आणि माझे पुण्यातील मित्र डॉ. अभिषेक हरिदास आम्ही दोघांनी मिळून फौजदारी याचिका दाखल केली होती. या याचिकेमध्ये आम्ही अब्दुल सत्तार शपथ पत्रात खोटी माहिती देऊन निवडणूक लढवत आमदार होत आहेत. यामुळे कुठेतरी लोकशाहीची हत्या होत आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २१०, २२३, लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ कलम १२५अ व मानव संरक्षण अधिकार अधिनियम १९९३ कलम ३० अन्वये आम्ही निवडणूक अधिकाऱ्यांसह अब्दुल सत्तार यांच्याविरोधात याचिका दाखल केली आहे.

# शहराला अनियमित पाणी पुरवठा होत असल्याने दररोज ठराविक वेळेत पाणी सोडण्याची 'राष्ट्रवादी'ची मागणी



**यवतमाळ :** शहरात पिण्याच्या पाण्याचा अनियमित पुरवठ्यामुळे नागरिक व महिलांना त्रास होत आहे. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा दररोज करण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने दि. २९ नोंव्हेंबरला महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन सादर केले.

यवतमाळ शहरात पिण्याच्या पाण्याचा रोज पुरवठा किंवा एक दिवसाआड तरी पुरवठा करण्याचे नियोजन करावे अशी मागणी राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षा सुनयना संजय येवतकर यांच्या शिष्टमंडळाने केली. यावेळी कार्यकारी अभियंता शिवलकर यांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारले. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये यवतमाळ शहरात सर्व टाक्यांमध्ये चोपडोह, निळोणा व बेंबळा प्रकल्पातून अमृत योजनेचे पाणी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन टाक्यांचे बांधकाम पूर्ण होत असून शहरात १९ टाक्या पूर्ण क्षमतेने पाण्यासहित कार्यान्वित झाल्या आहे. उर्वरीत टाक्यांचे काम लवकरच पूर्ण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय बेंबळा प्रकल्पातील काही कामे अपूर्ण असून त्याच्याही निविदा काढल्या असून ती काम लवकरच सुरू होईल असेही त्यांनी यावेळी शिष्टमंडळाला सांगितले.

शहराला रोज पाण्याचा पुरवठा किंवा एक दिवसाआड पाण्याचा पुरवठा करण्याबाबत नियोजन करण्याचा अधिकाऱ्यांना आग्रह केला. सध्या अनेक ठिकाणी पाणी येण्याची दिवस ठराविक नसल्याने अनेक ठिकाणी नागरिकांना अडचणी सहन कराव्या लागतात. त्यामुळे अमृत योजनेतील अपूर्ण भाग लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा असे शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना सांगितले.

यावर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल व तोट्या पूर्ण करण्यावर भर देण्यात येईल जेणेकरून शहरात पाणीपुरवठा पूर्ण ताकतीने सुरू करता येईल असे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष सुनयना येवतकर, शहर अध्यक्ष अबोली देशमुख, शहर कार्याध्यक्ष कांता लाहे, सुधा खडके, सुषमा बर्डे, संध्या वानखडे, अर्चना खुणे, कविता पांढरकर आदी महिला उपस्थित होत्या.

# अपूर्व विज्ञान मेळाव्यात ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग



**धुळे :** शहरातील जयहिंद हायस्कूलमध्ये शुक्रवारी अपूर्व विज्ञान मेळावा झाला. मेळाव्यात सहभागी बाल वैज्ञानिकांनी विविध उपकरण सादर केली. त्यात हवेतील प्रदूषण ओळखणारे यंत्र, सौरऊर्जेवरील उपकरणासह अन्य उपकरणांचा समावेश होता. मेळाव्यात ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मेळाव्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याची माहिती देण्यात आली. प्रदर्शनाला पालकांनी पाहणी केली.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढावा, या उद्देशाने हे प्रदर्शन झाले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध अविष्कार सादर केले. मेळाव्याचे उद्घाटन चेअरमन विजय पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी शरद बच्छाव, प्रमोद पाटील, डॉ. नितीन काकडे, प्राचार्य एस. व्ही. बैसाणे, उपप्राचार्य एस. डी. मोरे आदी उपस्थित होते. मेळाव्यात साडेतीन ते चारशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विज्ञान व इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उपकरण मांडली. पाचवी ते आठवी आणि नववी ते बारावी असे दोन गट स्पर्धेत सहभागी झाले होते.

अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवा यासाठी जनजागृती वीज, अस्वच्छता, आरोग्य या क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधन केले. सोलरवर काही विद्यार्थ्यांनी उपकरण सादर केली होती. अपारंपरिक ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर व्हावा या उद्देशाने विद्यार्थ्यांनी प्रदर्शनातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी कचरा व्यवस्थापन, हवेतील प्रदूषण ओळखणारे यंत्र, वाहतूक नियंत्रणासाठी रोबोटिक यंत्रणा आदी विषयांवर उपकरण मांडली.




# समताधीष्ठित समाजनिर्मितीत फुले यांचे योगदान : प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे



**येवला :** समताधीष्ठित समाजाच्या निर्मितीत क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वंचित, उपेक्षित समाजाच्या उन्नतीसाठी खर्च केले. फुले हे स्त्री पुरुष समतेचे पुरस्कर्ते होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांनी व्यक्त केले. कला व वाणिज्य महाविद्यालयात क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांच्या हस्ते फुले प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. गमे म्हणाले की, फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा स्थापन करत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्याच्या अथक प्रयत्नामुळे आजमितीस महिला सर्व क्षेत्रात सन्मानाने पुढे जात आहेत. देशाच्या गौरवात भर घालत आहेत. महात्मा फुले यांनी सुरू केलेला समाज सुधारणेचा प्रवाह हा देशाला दिशादर्शक ठरला. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. अविद्या हे शुद्रातिशुद्रांच्या ऱ्हासाचे कारण आहे, हे ओळखून त्यांना शिक्षित करण्याचा वसा फुल्यांनी हाती घेतला. गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड हे ग्रंथ लिहून शेतकरी, कष्टकरी यांच्या दुःखाला वाचा फोडली. त्यांना गुलामगिरीची जाणीव करून दिली. बहुजन समाजाला क्षीण करणाऱ्या परंपरावादी शोषण व्यवस्थेविरुद्ध एल्गार पुकारला. वंचित, उपेक्षितांच्या अंगणात ज्ञानाचा प्रकाश पाडणारे महात्मा फुले हे खरे क्रांतिसूर्य होते असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपप्राचार्य प्रा. पंढरीनाथ दिसागज, पर्यवेक्षक डॉ. रवींद्र ठाकरे, नॅक समन्वयक डॉ. मुकुंद भंडारी, परीक्षा विभागप्रमुख डॉ. धनराज धनगर, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. कैलास चौधरी यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.